Department of Agriculture Government of Maharashtra

The World Bank assisted

# Hon. Balasaheb Thackeray Agribusiness & Rural Transformation (SMART) Project

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प



# शेतमालाच्या संभाव्य किंमतींचा अंदाज अहवाल

## (ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ साठी)


## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम व्यवस्थापन कक्ष, पुणे

## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष –कृषी


(ऑगस्ट २०२५ मध्ये प्रकाशित)

**बाजार माहिती आणि जोखीम निवारण कक्ष** **ऑगस्ट - २०२५**


**मका** हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे अन्नधान्य पीक आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, अर्जेंटिना आणि भारत या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. भारतात मका खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश्या तिन्ही हंगामात घेतली जाते. प्रमुख मका उत्पादक राज्यांमध्ये मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश आदी राज्यांचा समावेश होतो.भारतात मक्याचा वापर हा मुख्यतः पोल्ट्री खाद्य, पशुखाद्य यासाठी केला जातो. या भारतात मक्याची मागणी, पुरवठा व उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा मक्याच्या किंमतीवर परिणाम होत असतो.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२४-२५ मध्ये, जगात मागील वर्षांच्या तुलनेत ०.६ टक्के मक्याचे उत्पादन घट होण्याच्या अंदाज आहे.




अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२३-२४ मध्ये, भारतात मागील वर्षांच्या तुलनेत १.५ टक्के मक्याचे उत्पादनात घट होण्याच्या अंदाज आहे. तसेच सन २०२३-२४ च्या तुलनेत २०२४-२५ मध्ये मक्याचे उत्पादनात १२.२७ टक्के वाढ होण्याचा असा अंदाज आहे.





केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या तिसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार राज्यात सन २०२४-२५ मध्ये एकूण मक्याचे उत्पादन मागील वर्षीच्या (२०२३-२४) तुलनेत ९९.०२ टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज आहे.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार मक्याची निर्यात २०२४-२५ मध्ये ६ लाख मेट्रिक टन होण्याचा अंदाज आहे, जी २०२३-२४ च्या तुलनेत २५% घट होईल असा अंदाज आहे.

देशांतर्गत किंमती वाढल्यामुळे आणि पिक कमी झाल्यामुळे २०२३-२४ या कालावधीत भारताची मका निर्यात चार वर्षांच्या निचांकी पातळीवर घसरली. इथेनॉल, कुक्कुटपालन आणि स्टार्च उत्पादकांकडून वाढलेल्या मागणीमुळेही निर्यातीत घट झाली.




देशात चालू वर्षीच्या जुलै २०२५ मध्ये मक्याची आवक मागील वर्षीच्या जुलै २०२४ च्या तुलनेत ३३.६७ टक्क्यांनी वाढली आहे.




* माहे ऑगस्ट, २०२५ ची किंमत दि. १७ ऑगस्ट पर्यंतची आहे.

मागील तीन वर्षातील नांदगाव बाजारातील मक्याच्या ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.


ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ - रुपये १९२९ प्रति क्विंटल
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ - रुपये २०१९ प्रति क्विंटल
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ - रुपये २०७५ प्रति क्विंटल

खरीप हंगाम २०२५-२६ साठी मका पिकाची आधारभूत किंमत (MSP) रु. २४०० प्रति क्विंटल इतकी जाहीर करण्यात आलेली आहे.

**ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ महिन्यासाठी मक्याचे नांदगाव बाजारातील किंमत अंदाज पुढील प्रमाणे : रुपये १८६० ते २४०० प्रति क्विंटल.**


बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष ऑगस्ट २०२५

**सोयाबीन:** सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किमतीवर परिणाम होत असतो.




**जागतिक सोयाबीन उत्पादन** (लाख टन)

अमेरिकन कृषी विभागाच्या, (USDA, ऑगस्ट. २०२५) अहवालानुसार सन २०२५-२६ मध्ये, जगात ४२७७ लाख टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत १ टक्केनी अधिक




**भारतातील सोयाबीन उत्पादन** (लाख टन)

भारतात सन २०२५-२६ मध्ये सोयाबीनचे उत्पादन १२५ लाख टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत १ टक्केनी कमी आहे. ( स्रोत: USDA, **ऑगस्ट** २०२५)




**सोयापेंड निर्यात** (लाख टन)

सन २०२४-२५ मध्ये सोयामीलच्या निर्यातीत मागील वर्षाच्या तुलनेत घट झाली आहे. सन २०२३-२०२४ मध्ये १९.७ लाख टन सोयापेंड निर्यात झाली आहे. **सन २०२४-२५ मध्ये** निर्यात १८.० लाख टन असून ती मागील वर्षाच्या तुलनेत कमी आहे. ( **स्त्रोत:** USDA, **ऑगस्ट २०२५**)




**सोयाबीन तेलाची आयात** (लाख टन)

सन २०२३-२४ च्या तुलनेत सन २०२४- २५ मध्ये सोयाबीन तेलाच्या आयातीत **तुलनेत ५४ टक्केनी** वाढ आहे. ( **स्त्रोत:** USDA, **ऑगस्ट २०२५**)



APMC बाजारातील सोयाबीनची आवक (लाख टन)

भारतात मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी सोयाबीनची मासिक आवक कमी दिसून येते. ( **स्त्रोत:** Agmarknet)



**लातूर (APMC) बाजारातील सोयाबीनच्या मासिक किंमती ( रु/क्विं.)**

सन २०२५-२६ खरीप हंगामासाठी किमान आधारभूत किंमत रु. ५३२८ प्रती क्विंटल आहे. मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी सोयाबीनच्या किंमती कमी आहेत ( स्रोत: Agmarknet). मागील तीन वर्षातील ऑक्टोबर -डिसेंबर महिन्यातील सरासरी किंमती खालील प्रमाणे होत्या:

ऑक्टोबर -डिसेंबर २०२२: रु. ५४२४ प्रती क्विंटल.

**ऑक्टोबर -डिसेंबर** २०२३: रु. ४८५५ प्रती क्विंटल.

**ऑक्टोबर -डिसेंबर** २०२४: रु. ४२३२ प्रती क्विंटल.


## लातूर बाजारातील संभाव्य किंमती –

## ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ : रु. ४५१५ ते ५१६५ प्रती क्विंटल


सदर संभाव्य किंमत अंदाज हा FAQ ग्रेडच्या सोयाबीनसाठी आहे.

## बाजार माहिती आणि जोखीम निवारण कक्ष ऑगस्ट - २०२५


**कापूस** हे भारतातील सर्वात महत्त्वाचे व्यावसायिक पीक आहे, जे 'व्हाइट-गोल्ड' म्हणून ओळखले जाते. जागतिक स्तरावर चीन आणि यूएसए नंतर भारत हा कापूस उत्पादन करणारा प्रमुख देश असून एकूण जागतिक कापूस उत्पादनापैकी २५% वाटा भारताचा आहे.





२०२४-२५ मध्ये जागतिक उत्पादन १२०२ लक्ष गाठीपर्यंत घटण्याचा अंदाज आहे. एकूणच, गेल्या महिन्यात आर्थिक दृष्टीकोन सुधारला असूनही २०२४-२५ विपणन वर्षासाठी जागतिक कापसाच्या मागणीचा दृष्टीकोन काहीसा नकारात्मक आहे.





राष्ट्रीय आयात आणि निर्यातीच्या बाबतीत, मागील वर्षाच्या तुलनेत २०२३-२४ मध्ये आयातीत आणि निर्यातीत वाढ होण्याचा अंदाज आहे. हाच कल जागतिक पातळीवर दिसला असून मागील वर्षीच्या तुलनेत आयात व निर्यातीमध्ये सरासरी ६% वाढ झाली आहे.





USDA-FAS च्या अंदाजानुसार विपणन वर्ष २०२४-२५ मध्ये भारतातील कापूस उत्पादन २५.४ दशलक्ष ४८० lb bales आहे., शेतकरी कापूस लागवडीचे क्षेत्र डाळी, मका आणि भात यासारख्या उच्च परतावा पिकांकडे वळवतील या अपेक्षे मुळे पेरणी केलेल्या १२.४ दशलक्ष हेक्टर क्षेत्रावरील गाठी मागील वर्षाच्या तुलनेत दोन टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. (स्रोत:USDA-Cotton Outlook)




देशात चालू वर्षीच्या जुलै २०२५ मध्ये कापसाची आवक मागील वर्षीच्या जुलै २०२४ च्या तुलेनत ७२.२१ टक्क्यांनी घटली आहे.




केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या तिसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार राज्यात सन २०२४-२५ मध्ये एकूण कापसाचे उत्पादन मागील वर्षीच्या (२०२३-२४) तुलनेत १४.७५ टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज आहे.




* माहे ऑगस्ट २०२५ ची किंमत दि. १७ जऑगस्ट पर्यंतची आहे.

मागील तीन वर्षातील अकोला बाजारातील कापसाच्या ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ - रु. ७९३९ प्रति क्विंटल
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ - रु. ८७१० प्रति क्विंटल
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ - रु. ७०८९ प्रति क्विंटल

खरीप हंगाम २०२५-२६ साठी मध्यम धाग्याच्या कापूस पिकाची किमान आधारभूत किंमत (MSP) रु. ७७१० प्रति क्विंटल इतकी जाहीर करण्यात आलेली आहे.

**ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीसाठी कापसाच्या किमती अंदाजे रु. ७,४५० ते ८,३५० प्रति क्विंटल राहतील.**

टीप: *सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शिवितो. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक, आणि सरकारी धोरण यामध्ये होणाऱ्या बदलामुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी वास्तविक किंमती या संभाव्य किंमती पेक्षा वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वाचकांनी या अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा.*

हा QR कोड स्कॅन करून

व्हॉट्सऍपवर कनेक्ट व्हा

लिंक – tinyurl.com/29fve7jb

---


अधिक माहितीसाठी

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) कृषी

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग,

सिम्बायोसिस कॉलेज समोर, गोखले नगर, पुणे- ४११०१६

फोन : **020-25656577**, टोल फ्री क्रमांक: **1800-210-1770**

ई-मेल : market.intelligence.smart@gmail.com

वेबसाईट : smart-mh.org